खरचं शिक्षण सुधारायचं का.....

महाराष्ट्राची देशपातळीवर शिक्षणात १७व्या क्रमांकाची घसरण झाल्याने महाराष्ट्राच्या मंत्रीमंडळ बैठकीत गंभीरपणे चर्चा झाली.मंत्रीमंडळाने यावर चर्चा करावी व कृतीगट नेमावा ही खूपच आश्वासक बाब आहे.यापूर्वी हिवाळी अधिवेशनात श्वेतपत्रिका काढण्याची केलेली घोषणा यानिमित्ताने पूर्ण करावी..सिंचनासोबतच शिक्षणातही पाणी कुठं मुरतयं याचाही शोध लागेल...

देशपातळीवर शिक्षणाची प्रतवारी लावणारे निकष हे सुविधांशी निगडीत होते..तरीही आपण १७व्या क्रमांकावर फेकलो गेलो..जर गुणवत्तेचा निकष लावला असता तर किती खाली गेलो असतो याची कल्पना करवत नाही..याचे कारण ७००पेक्षा जास्त शाळांमध्ये मुलांची चाचणी घेतलेल्या माझ्यासारख्याने ८वीचा मुलगा ५११ही संख्या ५००११ लिहीताना बघितलाय..९वीच्या वर्गात ऑस्ट्रेलिया हा शब्द न लिहीणारे अनेक विद्यार्थी आणि मी ऐवजी मि लिहीणारे कॉलेजतरूण बघितलेत..अर्थात हे न येणे म्हणजे गुणवत्ता नव्हे असे म्हटले जाते पण ८वर्षे शिकून या बाबी का येत नसतील हा अस्वस्थ करणारा मुद्दा आहे.त्यामुळे गुणवत्ता कशाला म्हणायचे यावर जरूर वाद करा पण किमान गोष्टी आल्याच पाहीजेत याबाबत एकमत असले पाहीजे..

महाराष्ट्राच्या शिक्षणात या अहवालाने संसाधनाबाबत दाखविलेल्या त्रुटींवर कार्यवाही झालीच पाहीजे.खाजगी शाळांच्या मॉल्सशी स्पर्धा करण्यासाठी ही संसाधने निर्णायक ठरत आहेत.तेव्हा ते निकष पूर्ण करण्याला प्राधान्य द्यायला हवे.शाळा या भौतिक बाबींमध्ये सुसज्जच असायल्या हव्यात.

पण त्याचबरोबर शिक्षणाचा दर्जा उंचावण्यासाठी पुढील बाबींवर या कृतीगटाने जर ठोस निर्णय घेतले तर नक्कीच शिक्षण कात टाकू शकते.व्यक्तिशः मला नोकरीतली सुरक्षितता राजकारणी व अधिकारी वर्गाची मनमानी हीच अनेक दोषांचे कारण वाटते व त्यावर उपाय म्हणून परदेशासारखे शिक्षणावरच्या खर्चाची रक्कम थेट व्हाउचर्स स्वरूपात पालकांच्या हातात द्यावी व पालकांनी आवडीच्या शाळा निवडाव्यात .त्यातून शिक्षण सुधारेल असे वाटते.पण हा निर्णय केंद्रस्तरावरचा असल्याने यावर न लिहीता राज्य सरकार प्रचलित शिक्षणव्यवस्थेत काय सुधारणा करू शकते याबाबत सूचना मांडतो...

१.शिक्षकांचे व अधिकारी यांचे उत्तरदायित्वच नक्की केले जात नाही हे दुखण्याचे मूळ आहे.कोणत्या इयत्तेत काय आले पाहीजे या क्षमतांनुसार शिक्षकाच्या कामाची तपासणी होवून त्याआधारेपुरस्कार बक्षीस शिक्षा वेतनवाढ बदली यांची जोड असायला हवी.वार्षिक तपासणीत हे अभिप्रेत असले तरी ते

होत नाही . याबाबतीत वर्षातून दोनदा काम कासचेकींगने तपासले तरी उत्तरदायित्व वाढेल पण हे केवळ शिक्षकाचे न करता केंद्रातील निकृष्ट व उत्कृष्ट शाळांच्या आधारे केंद्रप्रमुख विस्तारअधिकारी यांनाही बक्षीस शिक्षा मिळायला हव्यात तरच ते शाळा तपासणी सखोल व प्रेरणादायी करतील . आजच्या वाईट स्थितीला पर्यवेक्षण एकाचवेळी कडक व मार्गदर्शनपर नाही हे आहे . पूर्वी फक्त एकच दिपोती होता आज पहारेक यावर अनेक पहारेकरी आहेत...

२ . केंद्रप्रमूख विस्तारअधिकारी मुख्याध्यापक ही अत्यंत महत्वाची पदे आहेत . ती १00 टक्के स्पर्धा परीक्षेनेच भरली पाहीजेत व दर ३वर्षांनी त्यांच्या बदल्या व्हायला हव्यात . सेवाजेष्ठता हा निकष किमान शिक्षणात तरी बाद करावा . २३वर्षाच्या कलेक्टरकडे आपण एक जिल्हा सोपवतो तर एक छोटया शाळेची जबाबदारी देताना वयाची अट का

शासनाने शिक्षक सुधारण्याच्या प्रयत्नांपेक्षा गटशिक्षणाधिकारी व वरील तीन घटकांवर लक्ष केंद्रीत केले तर ३वर्षात महाराष्ट्राचे शिक्षण आमूलाग्र बदलेल . ५लाख शिक्षकांच्या प्रशिक्षणापेक्षा ४८00 केंद्रप्रमुख १६00 विस्तारअधिकारी व ३५४गटशिक्षणाधिका यांना सक्षम बनविणे सहज शक्य आहे .

३ . मसूरीला ज्याप्रमाणे सखोल प्रशिक्षण दिले जाते व त्यातून कलेक्टर घडतात . तसे महाराष्ट्रात एक अधिकारी प्रशिक्षण केंद्र गरजेचे आहे . शिक्षणक्षेत्रात अधिकारी हा साहेब न होता त्यातील शिक्षक मरता कामा नये . आज शिक्षणखाते हे इतर खात्यांसारखे झाले आहे . . एकाचवेळी कर्तव्यकठोर व प्रेरणा देण्याची क्षमता असणारे अत्यल्प अधिकारी आहेत . त्यासाठी संचालक ते केंद्रप्रमुख यांना वर्षातून प्रत्येकी १महिना प्रशिक्षण गरजेचे आहे . या प्रशिक्षण केंद्रात जगातील शिक्षणाचे नवे प्रवाह फिल्मस पुस्तके चांगल्या शिक्षकांच्या अध्यापनाचे सादरीकरण भारतातील प्रयोगशील शाळांचे माहितीपट शिक्षणतज्ञांची व्याख्याने असे उत्कृष्ट प्रशिक्षण केंद्र निसर्गरम्य ठिकाणी असले पाहीजे . हा खर्च एकदाच होईल पण शाळा बघता बघता बदलतील .

४ . शिक्षकांचे मूल्यमापनच होत नाही व सुरक्षिततेमुळे स्थितीवादीपणा वाढत जातो . शिक्षकांना कृतीप्रवण करायला गोपनीय अहवालाचा सकारात्मक वापर करायला हवा . आज शिक्षकांचे गोपनीय अहवाल व्यक्तिनिष्ठ असल्याने ते भ्रष्ट झालेत . त्यापेक्षा शहाजी ढेकणे यांनी १00गुणांचा गोपनीय अहवाल तयार केला तो शासनाने अभ्यासावा . त्यात शिक्षकाने केलेल्या उपक्रम अप्रगत मुलांसाठी. स्पर्धा परीक्षेसाठी केलेले प्रयत्न वाचलेली पुस्तके पुस्तकखरेदी सामाजिक उपक्रमातील स्हभाग इंग्रजीवर संगणकावरील प्रभुत्व प्रशिक्षणात तज्ज्ञ म्हणून केलेले काम याबाबींना १0गुण ठेवून त्याआधारे गोपनीय

अहवाल लिहीले तर चांगल्या शिक्षकांच्या कामाचे योग्य मूल्यमापन होईल. आज चांगल्याचे कौतुक नाही व वाईटाल शिक्षा नाही यामुळे शिक्षणातील कार्यसंस्कृतीच लोप पावली आहे.

५. शिक्षकांच्या प्रशिक्षणावर कोटयावधी खर्च झाला पण ती प्रभावशून्य ठरली. तेव्हा टेलीकॉन्फरन्सव्दारेच प्रशिक्षणे व्हायला हवीत. शिक्षकांचे लेखी काम खूप वाढले आहे. व्यंकटेश चौधरींच्या संशोधनानुसार २५ टक्के वेळ त्यात जातो. त्यासाठी प्रत्येक केंद्रामागे एक लेखनिक नेमणे गरजेचे आहे. संगणक आज मोठया संख्येने शाळांवर आहेत. त्यात या लेखी कामांसाठी सॉफ्टवेअर विकसित करावे. बाळंतपणाची रजा सहा महीने आहे. महाराष्ट्रात ४८टक्के शिक्षिका आहेत. शासन त्या शिक्षिकेच्या बाळाची काळजी करते पण तिच्या वर्गातील ४० लेकरांची काळजी करत नाही. तो वर्ग सहा महीने रिकामा पडतो. शिक्षकांच्या अर्जित रजेच्या काळात पर्यायी व्यवस्था काहीच नसते. गावोगावी बी. एड. कॉलेजेस वाढली. तेव्हा रजा काढून बी. एड. करण्याचे प्रमाण वाढले आहे. ते वर्गही रिकामे पडतात. तेव्हा असे बी. एड. करण्याला बंदी करून केवळ सुटीच्या काळातलेच बी. एड. ला परवानगी असावी. वर्ग रिकामे राहण्याला उपाय म्हणून प्रत्येक तालुक्यात २५डी. एड. पदवीधारक करारपध्दतीने नेमून रिकाम्या वर्गासाठी फिरते ठेवणे गरजेचे आहे. गुणवत्तेवर परिणाम करणारा हा सर्वात गंभीर मुद्दा आहे.

६. इंग्रजीसाठी स्वतंत्र शिक्षक नेमण्याची मुख्यमंत्रयाची घोषणा स्वागतार्ह आहे पण दीर्घकालीन उपाय करायला हवा. डी. एड. ४वर्षांचे करावे. त्यात स्पेशलायझेशन करावे. अ गटात मराठी इंग्रजी व कला आणि ब गटात गणित विज्ञान व सामाजिक शास्त्रे यापैकी एका गटात पदवी घ्यावी. शाळेवर नेमताना दोन्ही गटाचे शिक्षक समसंख्येने नेमावेत व माध्यमिक शाळांसारखी विषयानुसार शिकवण्याची तासवारी करावी. व्दिशिक्षकी शाळेत दोन गटांचे दोन शिक्षक असतील तर सर्व विषय तज्ज्ञतेने शिकवले जातील. आज एकाच शिक्षकाने सर्व विषय सारख्याच क्षमतेने शिकवावेत हे गृहीतक एक तर अज्ञानातून किंवा मुलांविषयीच्या बेफिकीरीतून आले आहे. विषयज्ञानाची तज्ञता तपासण्यासाठी शिक्षकांच्या दरवर्षी परीक्षाही असल्या पाहीजेत. त्या परीक्षांना अधिकारीही बसवावेत व त्याआधारेच वेतनवाढ दिली पाहीजे. पदवीधर शिक्षकाने इंग्रजी शिकवावे हे अभिप्रेत आहे. पण ७० टक्के पदवीधर शिक्षक हे इंग्रजीत पदवीधर नाहीत आणि ते ७वीला इंग्रजी शिकवतात. . हा विनोद आहे. पदवीधर हा इंग्रजीतच असावा एवढया एका शासननिर्णयाला काय अडचण आहे. . पण वर्षानुवर्षे हे असेच सुरू राहीले.

७ . सर्व शिक्षण अभियानात पैसा आला आणि प्रचंड गैरव्यवहार वाढले . केवळ प्रशिक्षणातील नाष्ता या एकाच बाबीने गटशिक्षणाधिकारी संवर्गात लाखो रूपये गेले . अपंगाची ऑपरेशन हंगामी वस्तीगृहे तालुकास्तरावरील सर्व अनुदाने व सादिल यात सर्व घटकांनी घोटाळे केले . राज्य पातळीवर एकत्र खरेदी करून शाळांवर शेकडो वस्तु आल्या . त्यात सर्व शिक्षा अभियान व शिक्षण संचलनालयाच्या १३व्या वित्त आयोगाच्या वस्तु आहेत . प्रत्येक तालुक्यात किमान २५ ट्रक साहित्य गेले . जे गावात सहज मिळते ते ही वरून आले . दुप्पट किंमत व निकृष्ट दर्जा यामुळे शिक्षकांचा अधिकारीवर्गाविषयीचा आदरच संपला . मुख्याध्यापकही अनुदानांवर शालेय पोषण आहारावर हात मारू लागले . एकूणच शिक्षणात पैसा आल्याने शुचिता नैतिकता संपली . . माध्यमिक विभागात तर शिक्षकमान्यतेचे उत्पन्न कोटीच्या घरात गेले . याबाबींची चौकशी होणार का . शिक्षकाच्या कामचुकारपणाची चर्चा होताना गेल्या १0वर्षात खर्च झालेल्या पैशाची सी . आय . डी . चौकशी झाली तरच शिक्षणात पुन्हा शुचितेचे वारे वाहतील . . अन्यथा शिक्षण रसातळाला जाईल . . बदल्यांमधला भ्रष्टाचार थांबवायला बदली आणि बढतीत ऑनलाईनपध्दतीने नेमणुक देण्याचा "नगर पॅटर्न" सर्व राज्यात लागू करावा त्यातून भ्रष्टाचार कमी होईल .

८ . अधिकारीवर्गाच्या मिटींगमध्ये जाणारा वेळ शाळाभेटींकडे वळवला पाहीजे . जिल्हा व राज्यस्तरावरील भेटीच होत नाहीत . त्यामुळे तळातले चित्रच वर पोहोचत नाही . तालुकास्तरावरील प्रशासन राजकीय हस्तक्षेप व शिक्षकसंघटना यामुळे बचावाच्या पावित्रयात आहे . गोविंद नांदेडे व लक्ष्मीकांत पांडे यांनी यासाठी भरारी पथके निर्माण केली होती . जिल्हास्तरावरून एक गाडी रोज सकाळी जिल्हयातील एका शाळेची निवड चिठठी काढून करणार आणि त्या शाळेजवळच्या ५शाळा निवडून अभिनंदनपत्र किंवा नोटीस देत . हा प्रयोग सर्व जिल्हयात राबवायला हवा . यात नियंत्रणाबरोबरच चांगले काम करणारेंचे कौतुक होते .

९ . माध्यमिक शाळांची संख्या प्रचंड वाढली आहे . त्यासाठी तालुक्याला स्वतंत्र गटशिक्षणाधिकारी गरजेचा आहे . आज प्राथमिक विभागच ते पाहतो . माध्यमिक शिक्षणात अपवाद वगळता शिक्षकभरती जात नातेवाईक व डोनेशन या निकषावर होते आहे . त्यामुळे गुणवत्तेचे व गरीब कुटूंबातील मुले शिक्षक होत नाहीत . तेव्हा शासनाने माध्यमिकची शिक्षकभरती ताब्यात घेवून सी . ई . टी . ने शिक्षक भरावेत . तरच माध्यमिक शिक्षण सुधारेल .

१० . शिक्षणात प्रयोगशीलता येण्यासाठी महाराष्ट्रातील प्रयोगशील शाळांना शासनाने जोडून घ्यायला हवे . कोठारी आयोगाने या शाळांना शिक्षणाच्या प्रयोगशाळा म्हटले होते . या शाळांना एस . सी . ई . आर . टी . ला जोडून प्रशिक्षणाची साहित्यनिर्मितीची जबाबदारी त्यांच्यावर देवून त्यांच्या प्रयोगांचे सार्वत्रिकीकरण करायला हवे . त्याबदल्यात त्यांना आर्थिक मोबदला द्यावा .

११ . गाडगेबाबा ग्रामस्वच्छता पुरस्कारांनी ग्रामीण महाराष्ट्र कृतीप्रवण झाला . त्या पुरस्काराच्या व इतर गावपातळीच्या पुरस्कारांच्या मूल्यमापनात गावच्या शाळेचा दर्जा उपक्रम गळती याबाबतचे गुण ठेवले तर गावकरी शाळेबाबत सजग होतील . त्याचबरोबर शालेय व्यवस्थापन समित्यांसाठी पुरस्कार सुरू केले तर शाळांमधील लोकसहभाग वाढेल . कर्मवीर भाऊराव पाटील किंवा साने गुरूजींच्या नावाने उत्कृष्ट काम करणाया शालेय व्यवस्थापन समित्यांना हे पुरस्कार द्यावेत . परीक्षणात शाळेतील १०० हजेरी गळती गुणवत्ता उपक्रम गावाचे योगदान शिक्षकांचे मुख्यालयी राहणे हे मुद्दे ठेवता येतील . हे पुरस्कार तालुका ते राज्य असे ठेवता येतील . महाराष्ट्रातील ६८आदिवासी तालुक्यातील शाळांचा दर्जा सुधारण्यासाठी आदिवासी विभागामार्फत ज्या शाळांत १०० हजेरी ०टक्के गळती व गुणवत्ता उपक्रम असतील त्या गावच्या ग्रामपंचायतींना १लाखाचे अनुदान दिले तर गावकरी शाळा सुधारण्यासाठी झटतील . शिक्षकांना सरपंचांचा मुख्यालयी राहण्याबाबतचा दाखला देणे सक्तीचे असते पण बहुसंख्य सरपंच खोटा दाखला देतात . . त्यासाठी त्या दाखल्याला ग्रामसभेची मान्यता ठेवावी . तरच हा गैरव्यवहार थांबेल .

१२ . शिक्षणाचा कायदा यशस्वी करण्यासाठी राज्यातील बालकामगार रस्त्यावरील मुले बालवेश्या स्थलांतरीत मुले यांची संख्या निश्चित करून कृतीकार्यक्रम गरजेचा आहे . या मुलांबाबतची इच्छाशक्ती कोणत्याच स्तरावर जाणवत नाही .

वरील ढोबळ सूचनांसारख्या अनेक सूचना शासनाला सर्व घटकांकडून मिळू शकतात . यातील अनेक सूचना अंमलात आणायला बिनखर्चिक आहेत . मंत्रीगटाने या सूचना जर अंमलात आणल्या तर महाराष्ट्र देशपातळीवर शिक्षणात नक्कीच अव्वल स्थान पुन्हा प्राप्त करू शकेल .

हेरंब कुलकर्णी

herambrk@rediffmail.com